2 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# शिक्षण क्षेत्रात गुणात्मक वाढ गरजेची : डी. आर. मोरे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

गेल्या काहीं वर्षांत शाळा व महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण झाली आहेत; मात्र शिक्षण क्षेत्रामध्ये गेल्या काही वर्षांत संख्यात्मक वाढ झाली असली तरी शिक्षणात गुणात्मक वाढ होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी केले. छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर)तर्फे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील प्राचार्यांसाठी 'अचिव्हिंग इन्स्टिट्यूशनल एक्सलन्स' या विषयावरील एकदिवसीय बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धती अमलात आणायला हवी. त्यासाठी शिक्षण क्षेत्रात अनेक आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. नॅकच्या माध्यमातून महाविद्यालयांची गुणवत्ता तपासली जाते; मात्र महाविद्यालयांनी नॅकच्या तपासणीच्या काळातच गुणवत्ता न जोपासता वर्षभर लहानसहान गोष्टींतून गुणवत्ता जोपासण्याचे काम केले पाहिजे.

पहिल्या सत्रामध्ये आय.क्यू.ए.सी. विभागाचे समन्वयक डॉ. टी. व्ही. शर्मा म्हणाले, नॅक मूल्यांकनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे श्रेणीकरण कार्यपद्धती. यामध्ये संस्थेला अनेक कामांचे ऑडिट रिपोर्ट करावे लागतात. बऱ्याच महाविद्यालयांना हे अहवाल तयार करताना अनेक समस्या व अडचणींना सामोरे जावे लागते; कारण हे अहवाल तयार करण्याचे कोणतेही विहित आराखडे उपलब्ध नाहीत. 'सायबर'चे संचालक डॉ. एम. एम. अली यांनी 'संस्थेच्या मूल्यांकन-श्रेष्ठतेची गरज आणि संबंध' या विषयावर मार्गदर्शन केले. नॅक मूल्यांकनासाठी उत्कृष्ट सादरीकरणही महत्त्वाचे आहे.

दुसऱ्या सत्रामध्ये संस्थेच्या निरनिराळ्या, अनिवार्य अहवालासाठी लागणारी सामग्री आणि तिचा मजकूर व स्वरूप कसे असावे, याची माहिती डॉ. सी. एस. काळे यांनी दिली. प्राचार्यांनी संस्थेचे भौतिक सादरीकरण कसे असले पाहिजे व ती पाहणी नॅक सभासदांद्वारे कशी केली जाते, याची माहिती घेतली. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी मार्गदर्शन केले. संयोजिका डॉ. विशाखा आपटे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 FEB 2017
तरुण भारत

# विद्यापीठात कौशल्य रोजगार मेळावा उद्या

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व गोखले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार ३ फेब्रुवारी रोजी कौशल्य व रोजगार मेळावा होणार आहे. मेळावा डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी विभागात होणार आहे. इच्छुकांनी मुलाखतीस येताना शैक्षणिक प्रमाणपत्रे, बायोडेटा ३ प्रतीत, एम्प्लॉयमेंटचे ऑनलाईन कार्ड तसेच पात्र पदांसाठी वेबपोर्टलवर ऑनलाईन अप्लाय करणे आवश्यक आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

## रोजगार मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विद्यापीठ कौशल्य विकास केंद्राच्या वतीने कौशल्य व रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. ३ फेब्रुवारीला सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये मेळावा होईल. मेळाव्यात दहावी, बारावीसह पदवी, पदव्युत्तर, डिप्लोमा, आयटीआय, एमसीए, एमबीए झालेले उमेदवार सहभागी होऊ शकतात.